सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

**नोंदणी व मुद्रांक विभाग,**

**सह जिल्हा निबंधक वर्ग-1(निम्नश्रेणी) व मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे ग्रामीण यांचे कार्यालय.**

**शासकिय छायाचित्र नोंदणी कार्यालयाची इमारत, पहिला मजला ,5- फायनान्स रोड, पुणे-411 001**

**दुरध्वनी क्र.020-26069508 ई - मेल आयडी - jdrpunerural03@gmail.com**

---

क्र.सजिनि/पुग्रा/आस्था/ 2001 /2020 दिनांक :- 15/ 05/2020

विषय - सह दुय्यम निबंधक वर्ग-2 / दुय्यम निबंधक श्रेणी-1 कार्यालये सुरु करणेबाबत

संदर्भ- 1) मा. जिल्हाधिकारी पुणे (आपत्ती व्यवस्थापन शाखा) यांचे आदेश क्र.आ.व्यप्रकक्ष/ कावि/ 157/2020 दि. 23/03/2020

2) मा. जिल्हाधिकारी पुणे (आपत्ती व्यवस्थापन शाखा) यांचे आदेश क्र.जि.आ.व्य/कोरोना विषाणू/249/2020 दि. 31/03/2020

3) मा. जिल्हाधिकारी पुणे (आपत्ती व्यवस्थापन शाखा) यांचे आदेश क्र.जि.आ.व्य/कावि/ 515/2020 दि. 14/04/2020

4) नियोजन विभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र. संकिर्ण-2020/प्र.क्र.15/का.1411 दि.17/04/2012 सोबतचे मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक इतिवृत्त नियोजन विभाग/का.1411 क्र. संकिर्ण-2020/प्र.क्र.15/का.1411 दि. 17/04/2012

5) मा. नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक , महाराष्ट्र राज्य पुणे यांचे परिपत्रक क्र. का-9/ उपाययोजना/2020 दि.19/04/2020

6) महसुल व वन विभाग यांचे आदेश क्र. डी एम यु/2020/सीआर/डिस एम-1 दि. 2/5/2020

7) सामान्य प्रशासन विभाग यांचे शासन निर्णय क्र. समय 2020/प्रक्र.35/18 (र व का ) दि. 4/5/2020

**आदेश**

ज्याअर्थी, मा. जिल्हाधिकारी साहेब, पुणे यांचे संदर्भ क्र. 1, 2 व 3 चे आदेशान्वये नोंदणी कार्यालयातील दस्त नोंदणी पुढील आदेशापर्यंत बंद करण्यात आली आहे,

आणि ज्याअर्थी, संदर्भ क्र. 4 चे इतिवृत्तामध्ये खालीलप्रमाणे नमूद करण्यात आले आहे.

*" स्थावर मालमत्ता खरेदी - विक्री व्यवहार पूर्ववत सुरु करुन मुद्रांक शुल्कविषयक ऑनलाईन प्रणालीद्वारे नोंदणी पूर्ववत सुरु करण्यात यावी "*

आणि ज्याअर्थी, संदर्भ क्र. 5 च्या परिपत्रकान्वये मा. नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक , महाराष्ट्र राज्य पुणे यांचे परिपत्रकामध्ये खालीलप्रमाणे सुचना देण्यात आलेल्या आहेत,

*" सध्यस्थितीत उक्त लॉकडाउन सुरु असुन पुढे ज्या ज्या भागातील परिस्थिती नियंत्रणात आल्याचे शासनाकडुन / जिल्हाधिकारी यांचेकुडुन (किंवा संबंधित स्थानिक सक्षम प्राधिकरणाकडुन ) जाहीर केले जाईल व त्यानंतर कार्यालये कार्यान्वित करण्यास जिल्हाधिकारी तथा जिल्हा निबंधक मान्यता देतील तेव्हा त्या भागातील दुय्यम निबंधक कार्यालये, मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालये व विशेष विवाह अधिकारी कार्यालये पुरेशी खबरदारी घेऊन सुरु करणे आवश्यक आहे."*

sankirna

Scanned with

तसेच सदर कार्यालये कार्यान्वित करताना व त्यापुढील कार्यालयीन कामकाज करताना कार्यालयीन कर्मचारी व नागरिक यांना कोरोना विषाणूचा संसर्ग होवु नये यासाठी राज्यातील सर्व अधिकारी / कर्मचारी यांचेसाठी उक्त परिपत्रकात सविस्तर सूचना / त्याबाबतच्या दक्षतेबाबत उपाययोजना निर्गमित केल्या आहेत.

सह जिल्हा निबंधक पुणे ग्रामीण यांचे अधिपत्याखालील खालील सर्व 21 दुय्यम निबंधक कार्यालये दस्त नोंदणीसाठी दिनांक 18 /05/2020 पासून ( सद्यस्थितीत घोषित केलेले प्रतिबंधित क्षेत्र (Containment Zone) वा भविष्यात घोषित होणाऱ्या प्रतिबंधित क्षेत्रातील (Containment Zone) दुय्यम निबंधक कार्यालये तो घोषित कालावधी वगळून ) सुरु करणेस परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | तालुका निहाय दुय्यम निबंधक कार्यालये |
|---|---|
| 1 | बारामती तालुका |
| | i) सह दुय्यम निबंधक वर्ग - 2 कार्यालय बारामती क्र. 1 |
| | ii) सह दुय्यम निबंधक वर्ग - 2 कार्यालय बारामती क्र. 2 |
| 2 | शिरूर तालुका |
| | i) दुय्यम निबंधक कार्यालय, शिरुर |
| | ii) दुय्यम निबंधक कार्यालय, तळेगाव ढमढेरे |
| 3 | दौंड तालुका |
| | i) दुय्यम निबंधक कार्यालय, दौंड |
| | ii) दुय्यम निबंधक कार्यालय, केडगाव |
| 4 | भोर तालुका |
| | दुय्यम निबंधक कार्यालय, भोर |
| 5 | वेल्हा तालुका |
| | दुय्यम निबंधक कार्यालय, वेल्हा |
| 6 | इंदापूर तालुका |
| | दुय्यम निबंधक कार्यालय, इंदापूर |
| 7 | जुन्नर तालुका |
| | i) दुय्यम निबंधक कार्यालय, जुन्नर |
| | ii) दुय्यम निबंधक कार्यालय, नारायणगाव |
| 8 | आंबेगाव तालुका |
| | दुय्यम निबंधक कार्यालय, आंबेगाव |
| 9 | पुरंदर तालुका |
| | दुय्यम निबंधक कार्यालय, पुरंदर |
| 10 | मुळशी तालुका |
| | i) दुय्यम निबंधक कार्यालय, मुळशी 1 (पौड) |
| | ii) दुय्यम निबंधक कार्यालय, मुळशी 2 (हिंजवडी) |
| 11 | मावळ तालुका |
| | i) दुय्यम निबंधक कार्यालय, वडगाव मावळ |
| | ii) दुय्यम निबंधक कार्यालय तळेगाव दाभाडे |
| | iii) दुय्यम निबंधक कार्यालय, लोणावळा |



Scanned with

| अ.क्र. | तालुका निहाय दुय्यम निबंधक कार्यालये |
|---|---|
| 12 | खेड तालुका |
| | i) दुय्यम निबंधक कार्यालय, खेड 1 (खेड) |
| | ii) दुय्यम निबंधक कार्यालय, खेड क्र. 2 (चाकण) |
| | iii) दुय्यम निबंधक कार्यालय, खेड क्र. 3 (खेड) |

वरील सदर तक्त्यातील सर्व सह दुय्यम निबंधक वर्ग 2 / दुय्यम निबंधक कार्यालयांनी संदर्भ क्र. 5 च्या परिपत्रकान्वये मा. नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पुणे यांनी दिलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करून कार्यालयीन कामकाज सुरु करावयाचे आहे.

(नवल किशोर राम)
मा. जिल्हा निबंधक तथा
जिल्हाधिकारी तथा
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे

प्रति,

1) सर्व सह दुय्यम निबंधक वर्ग- 2
2) दुय्यम निबंधक श्रेणी -1

प्रत,

1) मा. नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर,
2) मा. नोंदणी उपमहानिरिक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, पुणे विभाग पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर

Scanned with